e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# संहिता लेखन, संहिता संपादन एक कौशल्य

**प्रा. डॉ. रेखा दिगांबर अढाव**

श्री धाबेकर कला महाविद्यालय,

खडकी, अकोला

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.58

***सारांशः मराठी साहित्यामध्ये वाचन, लेखन परंपरा अतिशय समृध्द अशी परंपरा आहे. मराठी साहित्यामध्ये संहिता लेखन आणि संहिता संपादन ही उच्च आणि श्रेष्ठ प्रतीचकौशल्य आहेत. या कौशल्यांना प्राप्त करण्यासाठी प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला अतिशय जबाबदारीने आणि चतुरस्त्रपणे ,अभ्यासपूर्ण पद्धतीने स्वतःला तयार करावे लागते.संहिता लेखनासारखे अतिशय नाजूक आणि तितकेच नजाकतदार काम करण्यासाठी संहिता लेखकाला एकंदरीतच मानव जातीचा, समाज जीवनाचा आणि साहित्याचा अभ्यास असणे अनिवार्य आहे. संहिता संपादन करणारी व्यक्ती ही निकोप दृष्टिकोन असणारी असल्यास अतिशय उच्च दर्जाच्या संहिता संपादनाचे काम त्यांच्या हातून सहजच होऊ शकते. आज आपण मराठी साहित्यामध्ये साहित्य लेखन आणि संहिता संपादनामध्ये अनेक दिग्गजांनी केलेले काम वाचतो, बघतो. सिनेसृष्टीत तर संहिता लेखनाला अतिशय महत्त्व आहे .मराठी साहित्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे साहित्यप्रकार आपल्या दृष्टीस पडतात. प्रत्येक लेखक त्याच्या विचार, भावनेतील मजकूर पेनाच्या साहाय्याने कागदावर उतरवतो. मात्र संहिता संपादक लेखकाच्या मजकूराला वाचकांपर्यंत पोहोचवतांना त्याच्यावर नाना प्रकारचे संस्कार करून लेखकाच्या लेखनाला सौंदर्य प्राप्त करून देतो.***

प्रस्तावना

भारतीय परंपरेमध्ये साहित्य ,कला ,संस्कृती यांचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. भारतीय साहित्य संपदा अतिशय समृद्ध आहे. मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या साहित्यामध्ये वाचन लेखन कौशल्य अतिशय महत्त्वाचे आहे. वाचन, लेखन कौशल्याच्या बळावरच मानवी संस्कृतीचे जतन झाले आहे .इथल्या प्रथा, परंपरांनी मानवीय व्यवस्था आणि मानव परंपरा बळकट केली, त्या सर्व संपदेला लेखनाच्या माध्यमातून लिपीबद्ध करून अक्षर वांग्मयात समाविष्ट केले आहे .मानवाने जसजशी प्रगती केली तसतसे वाचन, लेखनाचे संदर्भ बदलत गेले आहेत. आज एकविसाव्या शतकात तर वाचन, लेखनाचे संदर्भ एकदमच पार बदलून गेले आहेत. औद्योगिक क्रांती नंतर खऱ्या अर्थाने तंत्रज्ञानाचे युग प्रभावीपणे मानवी जीवनामध्ये समाविष्ट झाले. तंत्रज्ञानाच्या उदयापूर्वी मानवी जीवनातले वाचन, लेखन, कला प्रकार

© 2024, SK Publisher All Rights Reserved

अतिशय संथ गतीने कार्यरत असल्याचे दिसून येते. वाचन ,लेखनाची साधनेही त्या काळामध्ये सीमित होती. वाचन ,लेखन करणारा मानवी समुदायही मर्यादित प्रमाणात होता. अतिशय दुर्लभ आणि दुर्मिळ अशा प्रकारची वाचन लेखनाची साधने सर्वसामान्यांच्या जगण्यापासून लांब होती. कालांतराने मानवी जगण्याचे संदर्भ बदलले .माणसाचे जगणे तंत्रज्ञानाच्या आशीर्वादाने सुलभ झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर माणसाची जगणे खऱ्या अर्थाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करायला लागले .संगणकाच्या आगमनाने तर मानवाच्या जगण्याला जणू काही चाकेच प्राप्त झालीत. या चाकांच्या गतीने मानवी जगणे अधिकच गतिमान आणि सुलभ झाले .वाचन, लेखन परंपरेतील वाचन परंपरा ही अतिशय समृद्ध अशी परंपरा आपल्याकडे आहे. मौखिक पद्धतीने अनेक अनेक पिढ्यांपासून पौराणिक ,ऐतिहासिक तसेच साहित्य विषयक संदर्भ आजही जीवित असल्याचे आपल्याला दिसून येते .महाराष्ट्रामध्ये शिक्षण परंपरेचा उदय होण्यापूर्वी वाचन परंपरा तसेच मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान संचयन किंवा ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची पद्धती अतिशय सुदृढपणे नांदत होती. गाव खेड्यांमध्ये पोथी ,पुराणे वाचण्याची परंपरा होती. एक व्यक्ती पोथी वाचायचा दुसऱ्या व्यक्ती किंवा पोथी वाचक त्या पोथीची फोड करून सांगायचा .आजही ही परंपरा ग्रामीण भागात बघायला मिळते .वाचन परंपरा ही अशी आपल्याकडे पूर्वापार चालत आलेली आहे. पूर्वी मात्र लेखन परंपरा सर्वसामान्यांच्या अवाक्यात नव्हती .सर्वसामान्य बहुजन वर्ग लेखन परंपरेपासून बराच दूर होता. महाराष्ट्रात फुले दांपत्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि खऱ्या अर्थाने तेव्हापासूनच मुली -महिला वाचन ,लेखनाने समृद्ध होऊन शिक्षणाच्या माध्यमातून सक्षमीकरणासाठी एक पाऊल पुढे आल्या. लेखन परंपरेमध्ये लेखन विषयक नियम आणि लेखन परंपरा विषयक नियमांना महत्व असल्याचे दिसते .लेखनामध्ये विविध साहित्यप्रकार आढळून येतात .पौराणिक, ऐतिहासिक ,प्राचीन अर्वाचीन अशी वर्गवारी साहित्यामध्ये आढळून येते .लेखक जे लेखन करतो त्यामध्ये कथा ,कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र प्रवासवर्णन, कविता ,ललित यांसारखे महत्त्वपूर्ण साहित्यप्रकार आहेत .लेखन आणि संपादन हे मराठी साहित्यामध्ये विपुल प्रमाणात झाले आहे .प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संहिता लेखन आणि संहिता संपादन यासंदर्भात अभ्यास करून विवेकी मांडणी करण्याचा प्रयत्न करणार आहे.

**संहिता लेखन म्हणजे काय ?**

खऱ्या अर्थाने संहिता लेखन हा शब्द दैनंदिन जीवनात सर्वसामान्यपणे फारसा वापरला जात नाही .मात्र काही अशी क्षेत्र आहेत ज्या ठिकाणी संहिता लेखन हा शब्द सरधोपटपणे वापरला जातो. उदाहरणार्थ नाट्यक्षेत्र ,सिनेक्षेत्र ,दूरचित्रवाणी या ठिकाणी सर्रासपणे संहिता लेखन हा शब्द वापरात येतो.

‘ संहिता हा शब्द सम- उपसर्गपूर्वक धा-धातूला क्त प्रत्यय लागून बनलेला आहे .व्युत्पतीनुसार या शब्दाचा अर्थ एकत्र ठेवणे असा होतो. व्याकरण परंपरेमध्ये प्रस्तुत शब्द संज्ञा अर्थात् सांकेतिक अर्थाने वापरताना व्युत्पत्यर्थ स्वीकारलेलाच आहे. प्रातिशाख्य- ग्रंथामध्ये ‘संहिता ‘ही संज्ञा स्पष्ट करतांना मंत्रातील पदांचे सलग उच्चारण विचारात घेतलेले आहे .ऋग्वेद प्रातिशाख्यानुसार मागील पदाच्या शेवटी असलेला वर्ण हा पुढील पदाच्या आरंभीच्या वर्णांमध्ये मिसळून त्या दोन मध्ये काळाचा अडसर न ठेवता केलेली उच्चारण म्हणजे संहिता होय.

वाजसनेयि -प्रातिशाख्यानुसार एका श्वासामध्ये उच्चारल्या जाणाऱ्या वर्णांचा योग अथवा एकत्रिकरण म्हणजे संहिता होय .

पाणिनी -वर्णांमधील मधील अत्यंतिक सानिध्य म्हणजे संहिता होय .

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 289-295

संहिताचा शाब्दिक अर्थ आहे" एकत्रित करणे, जोडणे, एकत्र करणे, एक संग्रह आणि मजकूर किंवा श्लोकांचे पद्धतशीर नियम आधारित संयोजन"

संहिता हा वेदातील सर्वात प्राचीन मजकुराचा संदर्भ आहे.

ज्यामध्ये मंत्र ,स्तोत्रे, प्रार्थना ,लिटनी आणि आशीर्वाद यांचा समावेश आहे.

**संहिता: गद्य अथवा पद्य लेखनाची मांडणी असलेला मजकूर संहिता**

**संहिता लेखन**

संहिता लेखन हे अतिशय जबाबदारीचे काम आहे .संहिता लेखन म्हणजे स्क्रिप्ट .जे एखाद्या सिनेमाचे, नाटकाचे आणि माहितीपटाचे असू शकते. स्क्रिप्ट लिहिण्यापूर्वी स्क्रिप्ट रायटरला मूळ कथा नकाचा अभ्यास करून संहिता लेखन करणे महत्त्वाचे असते .मूळ विषयाला बगल देऊन स्क्रिप्ट लिहिल्यास विषयाचा गाभा बाधित होऊन मूळ विषयाचा इसेन्स संहितेत न येण्याची शक्यता अधिक असते .संहिता लेखन सिनेमासाठी असल्यास त्याच्या लेखनाची पद्धती आणि क्रम निश्चितच वेगळा असणार .नाटकाची संहिता लिहिण्यास लिहावयाची असल्यास त्या लेखनाची पद्धत आणि क्रमही वेगळा असणार. एखादा माहितीपट एखादा तयार करावयाचा असल्यास त्याची लेखन पद्धती आणि क्रमही वेगळा असणार.

सिनेमा, नाटक ,माहितीपट दूरचित्रवाणी या प्रत्येक विषयाकरिता संहिता लेखन त्या त्या विषयानुसार त्या त्या पद्धतीचे आणि तांत्रिक बाजू सांभाळून करणे महत्त्वाचे असते .संहिता ही त्या त्या कलाप्रकाराचा प्राण असते.

**संहिता लेखनातील महत्त्वपूर्ण घटक**

१)सिनेमा, नाटक, अथवा माहितीपट किंवा दूरचित्रवाणी अशा कुठल्याही प्रकारच्या माध्यमातून संहिता लेखन करतांना काही तांत्रिक नियम पाळणे आवश्यक ठरते. संहिता लेखन करताना मूळ विषयाचा प्राण जपून शास्त्रशुद्ध पद्धतीने लेखन केल्यास विषयाला उणेपणा येत नाही. करिता लेखकाने काही महत्त्वपूर्ण गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. अन्यथा ध चार मा होण्याची शक्यता असते.

२) संहिता लेखन करताना मूळ कथानका मध्ये जो मुख्य विषय आहे त्यामध्ये जे घटक आहेत जसे की कथानकाचा विषय पौराणिक किंवा ऐतिहासिक असेल तर संहिता लेखनामध्ये त्या विषयाला धरून सगळे संदर्भ असले पाहिजेत.

३) संहिता लेखन हे कौशल्यपूर्ण काम आहे. केवळ कौशल्याचेच नाही तर जबाबदारीचेही आहे .त्यामुळे लेखकाने इतिहास, पुराण आणि साहित्य या विषयाचे दांडगे वाचन विश्वासार्ह अशा स्त्रोतातून करणे आवश्यक आहे .

४) संहिता लेखन करण्यासाठी लेखकाचा दृष्टिकोण विवेकी असावा .पूर्वग्रह दूषित भूमिका घेऊन संहिता लेखन करणे त्या विषयाशी प्रतारणा करण्यासारखे होऊ शकते. संहिता लेखनामध्ये लेखकाची वैयक्तिकरित्या कोणत्याही प्रकारच्या आपल्या समज-असमाजेचे प्रतिबिंब येता कामा नये.


Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by: Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 289-295

५) संहिता लेखनामध्ये लेखकाने आपले मत प्रामाणिकपणे मांडावे. लेखकाचे मत माणसाच्या जगण्याची प्रामाणिक असायला हवे .तरच ते संहितालेखन दर्जेदार होते.

६) संहिता लेखन करतांना लेखकाने तो जे लेखन करणार आहे त्याचा म्हणजे नाटक, कादंबरी, कविता, आत्मचरित्र यांचा प्रामुख्याने विचार करावा आणि त्यानुसारच लेखन होणे करणे आवश्यक आहे. कारण लेखनाचे तंत्र त्यासंबंधीचे नियम पाळणे या ठिकाणी आवश्यक होऊन जाते.

७) लेखकाला चित्रपटाचे संहिता लेखन करावयाचे असल्यास  त्याने अनेक चित्रपट बघून आपले अनुभवविश्व प्रथमतः समृद्ध करावे आणि त्यानंतरच त्या आधारावर लेखन करावे .

संहिता लेखकाला ह्या आणि ह्यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण घटकांवर लक्ष देऊन संहिता लेखन करावे लागते. संहिता लेखकाने मूळ स्त्रोतांना समजून घेऊन पूर्ण अभ्यासांती संहिता लेखन केल्यास असे लेखन निश्चितच सकस असणार.

**संहिता लेखनाचे प्रकार**

१) सिनेमा करिता संहिता लेखन: भारतीय समाज व्यवस्थेमध्ये दूरचित्रवाणी, दूरदर्शन यांसारख्या साधनांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्यातही चित्रपटांना अनन्यसाधारण असे महत्त्व आजही आहे .त्यामुळे या विषयाकरिता संहिता लेखन करणे अतिशय महत्त्वाचे ठरते .

२) नाटक: मराठी रंगभूमी ही अतिशय अभ्यासपूर्ण आणि सकस अशा विषयांना घेऊन समाज प्रबोधनाने मनोरंजन करणारी संस्था आहे. समकालीन विषयांना त्यामुळे न्याय मिळतो म्हणूनच नाटक या विषयाकरिता संहिता लेखन करणे एक आव्हानात्मक काम आहे.

३) दूरचित्रवाणी: दूरचित्रवाणी हा आज घराघरात पोहोचलेला अतिशय लोकप्रिय असा मनोरंजनाचा प्रकार आहे .दूरचित्रवाणीवर वेगवेगळ्या मालिका दाखविल्या जातात. त्यामध्ये पौराणिक, ऐतिहासिक, स्त्रीप्रधान, कुटुंब प्रधान काही सामाजिक ज्वलंत विषया करिता सहिता लेखन केले जाते. संहिता लेखन ही कला आणि कौशल्य ही आहे अतिशय जबाबदारीने आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने लेखकाला संहिता लेखन करावे लागते संहिता लेखनासंदर्भातील लिखाण अधिक व्यापक आशयाने लिहिता येईल. विस्तार भयास्तव येथे थांबणे संयुक्तिक आहे.

संहिता लेखनासोबतच संहिता संपादन हे सुद्धा अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने आणि जबाबदारीने करण्याचे काम आहे. संहिता संपादन म्हणजे नेमके काय आणि त्याची आवश्यकता कशी ?कुठे? भासते याविषयीचे विवेचन इथे आवश्यक आहे. खरे तर संहिता संपादन शब्द सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन वापरातला नाही .संहिता संपादना संदर्भात जेष्ठ संहिता संपादक ‘मृदुला जोशी ‘यांनी आपल्या भाषणातून सांगितले की जुन्या पोथी आणि हस्तलिखित ही जी असतात त्यांची चिकित्सक आवृत्ती तयार करणे म्हणजे संहिता संपादन.

दुसरा अर्थ जोशी यांनी सांगितला तो असा, ‘संहितेचा म्हणजे आपण नेहमी जी पुस्तक बघतो, वाचतो त्या पुस्तकांच्या संहितेचं संपादन. लेखकाने स्वतःहून आणून दिलेलं किंवा त्याच्याकडून मागवून घेतलेलं लिहून घेतलेलं मुद्दाम विषय देऊन लिहून घेतलेलं असं हस्तलिखित प्रकाशकाकडे येतं आणि प्रकाशक ते त्याच्या ध्येयधोरणात बसत बसत असल्यास प्रकाशासाठी स्वीकारतो .हे हस्तलिखित किंवा अलीकडच्या काळात कम्प्युटरवरची सॉफ्ट कॉपी म्हणजे पुस्तकाची संहिता.

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 289-295

हस्तलिखित असो टंकलिखित असो किंवा सॉफ्ट कॉपी असो संहितेच्या संपादनाची गरज असते. कारण त्याशिवाय पुस्तकाला चांगला घाट येत नाही. संहिता संपादनाचे काम अतिशय वेगळ्या पद्धतीचे आहे .संहिता संपादनाच्या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ करण्यापूर्वी संपादकाला प्रथमतः संहिता संपूर्णपणे वाचून काढावी लागते .पहिल्या वाचनानंतर संपादकाला काही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात. संपादकीय संस्कारांचे स्वरुपही ठरवावे लागते .संहिता संपादन करताना वाचक वर्ग डोळ्यासमोर ठेवून सर्व बाबी तपशीलवारपणे ठरवाव्या लागतात. संहिता संपादन दोन प्रकारे आपण अभ्यासतो. पहिला साहित्यिक संस्कार त्याला इंग्लिश मध्ये substantive editing असे म्हणतात. साहित्यिक संस्कार दुसरा म्हणजे तांत्रिक संस्कार म्हणजे इंग्लिश मध्ये त्याला copy editing असे म्हणतात. कुठल्याही संहितेचे या दोन प्रकारांनी संपादन करावे लागते.

सर्वसामान्यपणे ज्याला आपण संपादन असे म्हणतो त्यात मजकुराचे पुनर लेखन पुनर्रचना किंवा विषय वेगळ्या प्रकारे मांडण्याचा सूचना यांचा समावेश होतो .हे करताना संपादकाच्या कौशल्याचा कस लागतो. या प्रकारचे संपादकीय संस्कार किती प्रकारचे आणि कोणत्या प्रमाणात असावेत याविषयी संपादकाला अंगभूत समज असावी लागते. किंवा ती अनुभवाने वाढवावी लागते .संपादकीय कात्रीचा उपयोग जबाबदारीने पण तितकाच हळुवारपणे करावा लागतो. प्रत्येक संहिता ही वेगळी असते .त्या त्या लेखकाला जगण्याचा आलेला अनुभव आणि त्याच्या विचारांचा परिघ यावर अवलंबून असते .म्हणूनच संपादकाने प्रत्येक लेखकाला सरसकट एकच साहित्य संस्कार साच्या लावून जमणार नसते.

**संहिता संपादन करताना घ्यावयाची खबरदारी**

१) संहिता संपादन करताना मूळ संहितेचे स्वरूप आणि विषय समजून घेऊनच संपादन होणे आवश्यक असते. अन्यथा संहिता संपादनाच्या नादात संहितेचे प्राण गोठवले जाऊ शकतात .

२) संहिता संपादनाच्या कामांमध्ये संपादकांनी विवेकी विचाराने निष्पक्षपातीपणे विषयावर लक्ष केंद्रित करून वास्तविक संपादन करावे. उदाहरणार्थ स्त्री संपादकाने स्त्री आत्मचरित्राचे संपादन करताना पुरुषद्वेष्टी भूमिका घेऊन काम केल्यास संपादनाला उणेपणा येण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे संपादकाने स्त्री लेखक किंवा पुरुष लेखक अशा प्रकारची कोणतीच बाजू वरचढ न मानता साक्षेपी संपादन करावे.

३) संहिता संपादनाचे काम करताना संपादकाला लेखकाच्या कुठल्याही भावना ,आवेशाला बळी न पडता लेखकाचे विचार आणि मूळ विषयाचा करून संपादन करणे आवश्यक आहे. पुस्तकाचा घाट मूळ रूपात ठेवून संहिता संपादनाच्या संस्काराचे अवघड काम करणे आवश्यक आहे.

४) संहिता संपादकाला लेखकाच्या आशय अभिव्यक्तीचा सन्मान करून संहितेमध्ये गुणवत्तापूर्ण बदल सहजी करावे .संहिता संपादकाला लेखक हा प्रथम आणि महत्वाचा आहे याचे भान ठेवावे लागते .संहिता संपादन हे दुय्यम महत्त्वाचे काम आहे हे स्वीकारणे महत्त्वाचे.

५) संहिता संपादकाला तांत्रिक संस्कारांचा महत्वपूर्ण भाग संपादनाच्या कामांमध्ये पार पाडावा लागतो .त्याशिवाय संहिता संपादनाचे काम अधुरेच राहील. लेखकाने मजकुराचे मांडणी करताना व्याकरणाच्या किंवा भाषेच्या चुका ज्या अनावधानाने झालेल्या असतात त्यामध्ये

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 289-295

लेखकाला दुरुस्त्या सुचवून लेखकाच्या विचार मनातील भाव वाचकांपर्यंत अचूकपणे पोहोचवणे यासारखे क्लिष्ट काम संहिता संपादकाला सावधगिरीने करणे आवश्यक आहे .

६) संहिता संपादकाला वाचक वर्ग डोळ्यासमोर ठेवून संहिता संपादनाचे काम करणे आवश्यक आहे .मजकुराच्या तपशिलाचे पुनरुक्ती होणार नाही. तसेच संदर्भ ही व्यवस्थित असले पाहिजे याकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे.

७) संपादकाने समाजशास्त्रीय पुस्तकांमध्ये, शास्त्रीय पुस्तकांमध्ये किंवा इतिहासाशी संबंधित पुस्तकांमध्ये टीपा तळटीपा यांचे संपादन याविषयी खास लक्ष देणे आवश्यक आहे. संदर्भ, संदर्भातील सारखेपणा, संदर्भ देण्याची पद्धत याकडेही काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे.

८) संपादकाला अनेक विषयाचे ज्ञान असल्यास संपादक बहुस्रुत, चतुरस्त्र असल्यास संपादनाचे काम दर्जेदार होऊ शकते.

९) संहिता संपादनाचे काम करणाऱ्या लेखकाला स्वतःला अगदी अद्ययावत माहितीने परिपूर्ण ठेवणे आवश्यक आहे. ज्याला keeping abreast of the time म्हणतात. सतत वाचन लेखन करून ज्ञानाची क्षितिज विस्तारती ठेवणे यासाठी आवश्यक आहे .

१०) संपादकाला संपूर्ण हस्तलिखितातील मजकुराचे शुद्धलेखन तपासणे ही फार मोठी जबाबदारी लिलया पेलावी लागते .त्यासाठी त्याचे व्याकरणावर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास संदर्भ ग्रंथांचा वापर करूनही अचूकता गाठणे आवश्यक आहे.

संपादकाने लेखकाच्या मूळ आशयाला धक्का न लावता पुस्तकाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवण्याच्या दृष्टीने जे जे प्रयत्न करता येतील ते ते केले पाहिजेत. मूळ लेखकाशी चर्चा करून अधिक गुणवत्ता पूर्ण काम कसे करता येईल याकरिताचा पुरुषार्थ संपादकाला करावा लागतो. संहिता संपादक हा लेखक आणि वाचक यांच्या मधला सेतू असतो किंवा दुवा असतो. हे भान विसरता कामा नये. संहिता लेखन आणि संहिता संपादन या दोन्ही स्वरूपाच्या कामांमध्ये लेखक संपादकाचा कस लागतो हे निश्चितच खरे आहे .संहिता लेखन आणि संपादनाचे काम अतिशय जिकरीचे आणि सोबतच समाधान देणारे आहे .संहिता लेखकाच्या आशय अभिव्यक्तीला चार चांद लावण्याचे काम संहिता संपादक करत असतो. आणि म्हणूनच मराठी साहित्यामध्ये अनेकानेक उत्तमोत्तम अशा साहित्य कृती आहेत ज्या संपादकाच्या परिस्पर्शाने उजळून निघाल्या आहेत. संहिता लेखकान आणि संहिता संपादक हे जणू हिऱ्याला पैलू पाडणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे आहेत .

**निष्कर्ष**

१)संहिता लेखन हे संवेदनशीलपणे परंतु विवेकी दृष्टीने केल्यास मूळ संहितेचे आशय सौंदर्य दुणावते

२) संहिता लेखन हे अलीकडच्या काळात उत्तम करिअर करण्याचा एक मार्ग आहे .मात्र त्याकरिता लेखक होऊ घातलेल्या व्यक्तीला अभ्यासपूर्ण पद्धतीने शिस्तीत वाचन, लेखनाची सवय अंगी बाणवणे आवश्यक आहे.

३) संहिता लेखनाच्या क्षेत्रात आजच्या युवा पिढीला श्रमाच्या जोरावर चांगल्या प्रकारचा आर्थिक मोबदला आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळण्याची दाट शक्यता आहे

४) संहिता संपादन हे कौशल्य आणि कला अशा दुहेरी अंगाने संपादकाला समृद्ध करणारे आहे.

५) संपादकाला संहिता संपादनाच्या क्षेत्रात उत्तम लोकेशना आणि वित्तेषणा वाट्याला येण्यात काहीच अडचण नाही.

६) मराठी साहित्यामध्ये संहिता लेखन आणि संहिता संपादन हे दोन कौशल्य आत्मसात करणारे काही दिग्गज अभ्यासक आपल्याला बघायला मिळतात .

७) संहिता लेखन आणि संहिता संपादन ही दोन कौशल्य तर आहेतच सोबतच कलाही आहेत आणि म्हणूनच त्यासाठी श्रमसाधना आवश्यक आहे.

कलेसाठी कला आणि भल्यासाठी कला अशा दोन्हीही प्रकारे संहिता संपादन आणि संहिता लेखन याकडे आपण बघू शकतो. आज 21 व्या शतकामध्ये प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया या दोन्ही क्षेत्रांमध्ये संहिता लेखन आणि संहिता संपादन या दोन्ही प्रकारांना अतिशय चांगले दिवस आलेले आहेत. सन्मानाचे दिवस आलेले आहेत. संहिता लेखन आणि संहिता संपादन हे दोन्ही घटक आजच्या युवा पिढीला तारणारे आहेत. कारण ते श्रमाच्या आधारावर आत्मसात करता येणारे कौशल्य आहे. आणि ज्याच्याकडे आज कौशल्य आहे तोच ह्या व्यवस्थेमध्ये टिकू शकणार आहे. अशी स्थिती आज आपण सर्वच क्षेत्रांमध्ये बघतो आहोत.

## संदर्भ

१) मराठी विश्वकोश

२) विकिपीडिया वरून साभार

३) संहिता संपादक: डॉक्टर मृदुला जोशी यांचे नेटवरील भाषण

:::. Cite this article .:::

अढाव, प्रा. डॉ. रेखा दिगांबर. (2024). संहिता लेखन, संहिता संपादन एक कौशल्य. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 289–295.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.58

© 2024, SK Publisher All Rights Reserved